आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ मार्च २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपहारगृह, हॉटेलांना सोमवारपासून अतिरीक्त एलपीजी द्यायला केंद्र सरकारची परवानगी, मात्र पाइप गॅस जोडणीसाठी नोंदणी आवश्यक

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इराणचे अध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा

- इराणवरचे हल्ले कमी करण्याचा अमेरिकेचा विचार, इस्राइलचा मात्र विरोध, हल्ले थांबवण्याचं जगभरातल्या २२ देशांचं इराणला आवाहन

आणि

- दक्षिण कोरियात वाहनांचे सुटे भाग बनवणाऱ्या कारखान्याला लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू

<><><><><>

सोमवारपासून व्यावसायिक ग्राहकांसाठी आणखी २० टक्के एलपीजी द्यायची तयारी केंद्र सरकारनं दाखवली आहे. त्यामुळं राज्यांना त्यांच्या मासिक सरासरीच्या एकूण ५० टक्के एलपीजी सोमवारपासून मिळेल. खासगी उपहारगृह, ढाबे, हॉटेल, कंपन्यांमधली उपहार गृह, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवली जाणारी भोजनगृह, अन्न प्रक्रीया आणि डेअरी उद्योगाला हा व्यावसायिक एलपीजी देताना प्राधान्य दिलं जाणार आहे. याशिवाय ५ किलोचे सिलिंडर घेणाऱ्यांनाही प्राधान्य द्यायचे निर्देश केंद्रीय पेट्रोलियम सचिवांना सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिले आहेत. या सर्वांना या एलपीजी पुरवठ्याचा लाभ घेण्यासाठी पेट्रोलियम कंपन्यांकडे नोंदणी करावी लागेल. तसंच पाइप गॅसची जोडणी घेण्यासाठी संबंधित कंपनीकडे अर्ज देऊन आवश्यक प्रक्रीया पूर्ण करावी लागेल. तरच त्यांना हा अतिरीक्त पुरवठ्यातला एलपीजी मिळेल.

<><><><><>

देशभरात आज पारंपरिक उत्साहात रमजान ईदचा सण साजरा करण्यात आला. मुस्लिम नागरिकांनी आज ठिकठिकाणी सामुहिक नमाज अदा केली आणि एकमेकांच्या गाठीभेठी घेऊन ईदच्या शुभेच्छा आणि भेटवस्तू दिल्या.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू , उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन  आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण आत्मसंयम, वंचितांबद्दल करुणा बाळगण्याची तसंच दानधर्म करण्याची शिकवण देतो असं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या. सर्वांच्या हृदयात आशा, सौहार्द आणि करूणा रुजावी अशी प्रार्थना उपराष्ट्रपतींनी केली.

तर या मंगलप्रसंगी सर्वांना आनंद, सुख, उत्तम आरोग्य आणि समृद्धी लाभो अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

पारशी बांधवांनीही आज नवरोज परंपरागत पद्धतीनं साजरा केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे अध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियान यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली आणि त्यांना ईद तसंच नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. पश्चिम आशियातल्या विविध ठिकाणांवर सुरू असलेल्या हल्ल्यांचा यावेळी निषेध करण्यात आला, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. इराणमधल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी इराणच्या अध्यक्षांचे आभार मानले आणि जहाजांची वाहतूक सुरक्षितरित्या होईल याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी पुन्हा एकदा पेजेश्कियान यांना केलं.

**<><><><><>**

मध्यपूर्वेतल्या लष्करी कारवाया थांबवण्याच्या दिशेने विचार करत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं. त्यानंतर काही तासांतच इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी इराणवरचे हल्ले वाढवण्याचा इशारा दिला. त्याचवेळी आखाती देशांसह जगभरातल्या २२ देशांनी इराणनं हल्ले थांबवावेत आणि आणि होरमुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करावी असं आवाहन केलं आहे.

दुसरीकडे इराणला केवळ युद्धविराम नाही, तर पूर्णतः आणि कायमस्वरुपी युद्धविराम हवा असल्याचे इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(इस्रायल आणि अमेरिकेकडून होत असलेल्या हल्ल्यात इराणच्या नातांझ अणू संवर्धन प्रकल्पावर हल्ला झाला असल्याचं वृत्त इराणमधल्या वृत्तसंस्थेनं दिलं आहे. मात्र या हल्ल्यात*

*कोणतीही किरणोत्सर्ग गळती झालेली नसल्याचंही या वृत्तात म्हटलं आहे. हा प्रकल्प इराणचं मुख्य युरेनियम संवर्धन केंद्र असून युद्धाच्या पहिल्या आठवड्यातही या प्रकल्पाला लक्ष्य केलं गेलं होतं.*

*अमेरिकेनं मध्य पूर्व आशिया क्षेत्रात सुमारे अडीच हजार सैनिकांसह तीन अतिरिक्त लढाऊ जहाजं पाठवल्याचं वृत्त आहे.*

*इराणनं हिंद महासागरातल्या दिएगो गार्सिया बेटावरच्या ब्रिटन आणि अमेरिकेच्या संयुक्त लष्करी तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला. हा तळ इराणपासून सुमारे चार हजार किलोमीटर अंतरावर आहे.*

*हा हल्ला बेजबादार असल्याची प्रतिक्रिया ब्रिटननं दिली आहे. अमेरिका आणि इस्रायलनं इराणवर केलेल्या हल्ल्यात ब्रिटनचा थेट सहभाग घेतलेला नाही. मात्र अलिकडेच ब्रिटननं अमेरिकन बॉम्बर विमानांना ब्रिटिश तळांचा वापर करण्याची परवानगी दिली होती. मात्र हा हल्ला त्यापूर्वीच झाल्याचं म्हटलं जात आहे.*

*संयुक्त अरब अमिराती, बहरीन, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियासह इतर काही देशांनी संयुक्त निवेदन जारी करुन व्यापारी जहाजांवरचे तसेच मध्य आशिया क्षेत्रातल्या तेल आणि वायू प्रकल्पांवर इराणनं केलेल्या हल्ल्यांचा निषेध केला. इराणच्या या कारवाईचे परिणाम जगभरातल्या सर्वच देशांना, विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या देशांना सोसावे लागणार असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.*

*या युद्धात आत्तापर्यंत इराणमध्ये तेराशे पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलमध्ये १५ जण मारले गेले असून वेस्ट बँक क्षेत्रातही चार जणांचा मृत्यू झाला आहे. अमेरिकेचे १३ सैनिक यात मारले गेले आहेत. इस्त्रायलनं लेबनॉवर केलेल्या हल्ल्यांमध्ये आत्तापर्यंत एक हजारापेक्षा जास्त नागरिक मारले गेल्याचं तसंच, दहा लाखांपेक्षा जास्त लोक विस्थापित झाल्याचं लेबनॉन सरकारनं म्हटलं आहे.*

*दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोजताबा खामेनेई यांनी इराणी दूरचित्रवाणीवरून नवरोज निमित्तचा संदेश प्रसारित केला. या संदेशातून त्यांनी या युद्धात इराणी जनतेनं दाखवलेल्या धैर्याचं कौतुक केलं.*

**<><><><><>**

जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणं गरजेचा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. मुंबईत लोकभवन इथं रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात आज ते बोलत होते. हार्ड स्किल आणि सॉफ्ट स्कील यांची सांगड घालणाऱ्यांना भविष्यात स्थान असेल असं त्यांनी अधोरेखित केलं. कुशल मनुष्यबळ निर्माण करून भारत स्वतःसह जगाला  आर्थिकदृष्ट्या सक्षम करत असल्याचं ते म्हणाले.

यावेळी उपराष्ट्रपतींनी वेगवेगळ्या विभागात प्रथम आलेल्या सहा विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान केली. तसंच राज्यातल्या युवांना कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या तीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा गौरव केला.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सकाळी उपराष्ट्रपतींनी नागपूरमध्ये भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला संबोधित केलं. जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं ते यावेळी म्हणाले.

उद्या ते पुण्याजवळ उरळीकांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना दिन कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

देशाच्या विकासासाठी अर्थकारण आणि पर्यावरण या दोन्ही घटनांमध्ये समतोल साधायला हवा आणि यासाठी विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन गरजेचा आहे, असं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले. ते आज आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त देहरादून इथं आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत बोलत होते.

**- - - होल्ड - भुपेंद्र यादव - - -**

निसर्गाच्या संवर्धनासाठी भारताची बांधिलकी आणि जबाबदारी याचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

**<><><><><>**

भाजपनं आज केरळ विधानसभा निवडणुकीसाठी भाजपनं ११ उमेदवारांची तिसरी यादी तर पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीसाठी नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. आसाममधल्या दोन जागांसाठीही भाजपानं आज उमेदवार जाहीर केले.

<><><><><>

मालदीवच्या फेलिधू बेटाजवळ एक स्पीडबोट उलटून झालेल्या अपघातात रेमंड समुहाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया किरकोळ जखमी झाले. अन्य दोन भारतीय बेपत्ता आहेत.

<><><><><>

दक्षिण कोरियातल्या देजॉन शहरात काल लागलेल्या आगीतील मृतांची संख्या १४ झाली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातल्या एका वाहनाचे सुटे भाग बनवण्याच्या कारखान्याला लागलेल्या या आगीत ५९ जण जखमी झाले आहेत. आग लागली तेव्हा १७० कामगार आत होते. राष्ट्रपती ली जे म्युंग यांनी आज घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत यंदा पहिल्यांदाच व्हिडिओ रिव्ह्यू अर्थात चित्रफीतींच्या आधारे पडताळणी करणाचे तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. ऑल इंग्लंड क्लबने ही घोषणा केली. क्लबच्या सेंटर कोर्ट क्रमांक १ या मुख्य कोर्टसह, कोर्ट क्रमांक २, ३, १२ आणि १८ या इतर चार प्रमुख कोर्टवर हे तंत्रज्ञान उपलब्ध असेल अशी माहितीही ऑल इंग्लंड क्लबनं दिली आहे.

<><><><><>

नाशिक पोलिसांनी आज अशोक खरात याची कसून चौकशी केली आहे. या प्रकरणातील पीडित महिलांची ओळख सार्वजनिक होईल अशा प्रकारे वार्तांकन करून नये, अन्यथा कारवाई केली जाईल अशी सूचनाही विशेष तपास पथकानं केली आहे.

//<><><><><>//